Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

३४ /२०२४

**विषय** - महात्मा गांधी जयंती निमित्त 'विशेष स्वच्छता' अभियान

**संदर्भ** - परिपत्रक जा.क्र.आस्थापना/१५४८ दि.२९/०८/२०२४

सर्व अधिविभाग प्रमुख, संचालक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवकांना आदेशान्वये कळविण्यात येते की, महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून **दि. ०१ सप्टेंबर, २०२४ ते दि.३० सप्टेंबर, २०२४** या कालावधीमध्ये शिवाजी विद्यापीठामध्ये **'विशेष स्वच्छता अभियान'** राबविण्यात आलेले होते. सदर कालावधीमध्ये साठापडताळणी विभागामार्फत गठित समितीने विविध अधिविभाग व वसतिगृहांना भेटी देवून अधिविभागात सुस्थितीत किंवा वापरात येणारे फर्नीचर/साहित्य विनावापर असलेल्या साहित्याची तसेच. वापरात न येणारे असे निरुपयोगी साहित्याचे निर्लेखन करणे आवश्यक आहे अशा साहित्याची माहिती घेवून त्याचा अहवाल संबधित अधिविभागास व आस्थापना विभागास सादर केलेला आहे. सदर अहवालानुसार संबधित अधिविभाग व प्रशासकीय विभागांनी दि.३१/१०/२०२४ रोजी पर्यंत खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

१ ) **अभियांत्रिकी विभाग** - ज्या अधिविभागांनी/ वसतिगृहांनी निर्लेखनासाठी किंवा पूनर्वापरासाठी जे साहित्य निर्लेखनांची कार्यवाही पूर्ण करुन अधिविभागात ठेवलेले आहे. ते साहित्य तात्काळ अभियांत्रिकी विभागाने ताब्यात घ्यावे. ज्या साहित्याची किरकोळ दुरुस्ती करुन पूनर्वापर होवू शकतो अशा साहित्याची सविस्तर यादी तयार करुन सर्व अधिविभाग व प्रशासकीय विभागाना देण्यात यावी. तसेच, सदर साहित्याची अधिविभाग व प्रशासकीय विभागाकडून मागणी आल्यास ते त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावे. याबाबत आवश्यक त्या सर्व नोंदी ठेवण्यात याव्यात.

२) **साठापडताळणी विभाग, संगणक केंद्र व युसिक विभाग** - ज्या अधिविभागाने साहित्य/उपकरणे निर्लेखन करण्याच्या अनुषंगाने साठापडताळणी विभाग, संगणक केंद्र व युसिक विभागाकडे अभिप्राय/अहवाल मागणी केलेला आहे त्याबाबत संबधित विभागाने तात्काळ अभिप्राय/अहवाल द्यावा.

३) **सर्व अधिविभाग /प्रशासकीय विभाग/वसतिगृह** - यांनी आपल्या अधिविभागात सुस्थितीत किंवा वापरात येणारे फर्नीचर/साहित्य विनावापर आहे. तसेच वापरात न येणारे अशा निरुपयोगी साहित्याचे निर्लेखन प्रकीया पूर्ण करुन सदरचे साहित्य दि.३१/१०/२०२४ पूर्वी अभियांत्रिकी विभागाकडे देण्याची कार्यवाही करावी. अन्यथा सदरचे साहित्य अभियांत्रिकी विभाग ताब्यात घेईल. याबाबत भविष्यात काही तांत्रिक अडचण निर्माण झालेस त्यास संबधित अधिविभाग/विभाग जबाबदार राहिल. याची नोंद घ्यावी.

(डॉ. व्ही. एन. शिंदे )
कुलसचिव

जा. क्र. आस्थापना/2020
दि. 17 OCT 2024
प्रति,

माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक,
२) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. अधिष्ठाता, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
३) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.